# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

कुलसचिव दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२


वाचा : मा. पोलीस अधिक्षक, अकोला यांचे पत्र क्र. श.वा.नि.शा./दुचाकी चालक हेल्मेट सक्ती करणे/८९/२०२५/ अकोला दि. ११/०२/२०२५.

## परिपत्रक

क्र. साप्रवि/जीजी-१/परिपत्रक- हेल्मेट सक्ती/3911 /२०२५ दिनांक :08/०३/२०२५

मोटार वाहन कायदा कलम १२९/१९४ (D) प्रमाणे दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेट परिधान करणे बंधनकारक असल्याने तसे न केल्यास उपरोक्त मोवाका कलम प्रमाणे १०००/- रु. दंड आहे. करीता सर्व शासकीय कार्यालयातील प्रभारी अधिकारी यांनी आपल्या कार्यालयामध्ये काम करणारे अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयामध्ये दुचाकी वाहन वापरणे करीता हेल्मेट सक्ती करावी हेल्मेट न घातल्यामुळे झालेले अपघात आणि दुचाकी चालवितांना हेल्मेट घालणेबाबत समज देण्यात यावी याबाबत मा. पोलीस अधिक्षक, अकोला यांचे संदर्भिय पत्र प्राप्त झालेले आहे. तसेच त्यासोबतच अपघात कमी करण्याबाबत नागरिकांना हेल्मेट घालण्याचे आवाहन - आवाहन पत्र सुध्दा सोबत जोडलेले आहे.

सदर आदेशान्वये विद्यापीठातील अकोला जिल्हयातील सर्व नियंत्रण अधिकारी / कार्यालय प्रमुख / विभाग प्रमुख व त्यांचे अधिनस्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना हेल्मेट (Helmet) परिधान करणे बंधनकारक राहील याबाबत त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

SK

**सोबत :** आवाहन पत्र

**(एस. के. ठाकरे)**
**कुलसचिव**
**डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला**

**प्रतिलीपी :**

१) संचालक (सर्व) ----------------------------------------------------------------

२) अधिष्ठाता (सर्व) ----------------------------------------------------------------

३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व) -------------------------------------------------------

४) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व) -------------------------------------------------

५) प्रभारी अधिकारी (सर्व) ---------------------------------------------------------

६) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell) यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

७) विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) -----------------------------

८) विद्यापीठ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी

९) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि.)

१०) सहायक कुलसचिव (आस्थापना/साप्रवि/परिक्षा/समिती/प.शि.सं./कृ.म.वि./उ.वि.म./व.वि.म./कृषि अभि.)

११) सहायक नियंत्रक (अंदाजपत्रक/मुख्यालय)/अधिदान व लेखाधिकारी, अकोला.

१२) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक / तांत्रिक सचिव यांना माहितीकरीता सादर.

१३) मा. कुलसचिवांचे स्वीय सहायक यांना माहितीकरीता सादर.

१४). सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

१५) मा. पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय अकोला.

१५) ----------------------------------------------------------------------------

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला

फोन नं. ०७२४-२४३५००२, फॅक्स नं. ०७२४-२४४५३१७

E-mail ID :- sp.akola@mahapolice.gov.in

जा.क्र:-श.वा.नि.शा./दूचाकी चालक हेल्मेट सक्ती करणे / ८e / २०२५ अकोला दि.११/०२/२०२५

प्रति,

मा. कुलगुरू सोहेब कार्यालय
पंजाबराव कृषी विद्यापीठ
अकोला, जि.अकोला

संदर्भ क्रमांक:- १) ) शासन निर्णय क्र.एमव्हीआर-११२२/प्र.क्र.२०४/पारि-२ मंत्रालय,मुंबई दि.२०/मार्च २०२३

२) मा.मुख्य सचिव,म.रा.मुंबई दिनांक २२/०१/२०२५ रोजी दुरदृश्यप्रणाली (video Conference)मध्ये त्यांनी अपघात कमी करणेबाबत केलेले मार्गदर्शन.

३) महाराष्ट् परिवहन आयुक्त,मुंबई याचे जा.क्र.पआका/रस्ता सुरक्षा/२०२०/जा.क्र.४२२९ दिनांक ०६/०५/२०२०

४) मा.अपर पोलीस महासंचालक (वाहतुक)यांचे जा.क्र.प्र.ज.वा./४४/वा/ २६०५/२०२३,दिनांक २५/०६/२०२३

**विषय:-आपले कार्यालयात येणारे आपले अधिनस्त अधिकारी/कर्मचारी (दुचाकी वाहन चालक) यांना हेल्मेट सक्ती करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मोटार वाहन कायदा कलम १२९/१९४ (D) प्रमाने दुचाकी वाहन चालवितांना हेल्मेट परीधाण करणे बंधनकारक असल्याने, तसे न केल्यास उपरोक्त मोवाका कलम प्रमाने १०००/- रू दंड आहे. करीता आपले कार्यालयात आपले अधिनस्त अधिकारी/कर्मचारी जे दुचाकी वर कार्यालयात येतात त्यांना हेल्मेट घालण्याबाबत सुचना देण्यात यावी. दुचाकी वाहन चालकांची रस्त्यावर सुरक्षीतता सुनिश्चित करणे अत्यंत महत्वाचे आहे. दुचाकी चालवितांना हेल्मेट घालणे हे एक साधे पण महत्वाचे पाउल आहे. जे जिव वाचवु शकते हेल्मेट न घातल्यामुळे मागील वर्षात अकोला जिल्हयात २२३ दुचाकी चालक मृत्यूमुखी पडले आहे व १४० गंभीर दुखापत झाले आहे.

करीता आपले अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांना दुचाकी चालवितांना हेल्मेट परीधान करणे बाबत सक्ती करावी. व जे अधिकारी/ कर्मचारी हेल्मेट घालनार नाहीत त्यांना लेखी समज देण्यात यावी असे अकोला पोलीस दलातर्फे आवाहन करीत आहोत.

सोबत:- आवाहन पत्र सोबत जोडलेले आहे. सदर पत्र आपले सर्व अधिनस्त कार्यालयात पाठवावे, ही विनंती.

(बच्चन सिंह, भा.पो.से.)

पोलीस अधीक्षक,अकोला.

प्रत सस्नेह अग्रेषित :- १)मा.जिल्हाधिकारी, अकोला

२) मुख्य कार्यकारी अधिकारी अकोला,

३) आयुक्त म.न.पा अकोला.

Registrar

24/2/25

R/544
24/2/25

REGISTRAR OFFICE
DR. P.D.K.V., AKOLA
24 FEB 2025
In. No. 549

1202
21/2/25

C/3

# आवाहन पत्र

## अकोला पोलीस

### ''अपघात कमी करण्याबाबत नागरिकांना हेल्मेट घालण्याचे आवाहन ''

संदर्भ :- १) महाराष्ट् परिवहन आयुक्त,मुंबई याचे जा.क्र.पआका/रस्ता सुरक्षा/२०२०/जा.क्र.४२२९ दिनांक ०६/०५/२०२०

२) मा.मुख्य सचिव,म.रा.मुंबई दिनांक २२/०१/२०२५ रोजी दुरदृश्यप्रणाली (video Conference)मध्ये त्यांनी अपघात कमी करणेबाबत केलेले मार्गदर्शन.

३) शासन निर्णय क्र.एमव्हीआर-११२२/प्र.क्र.२०४/पारि-२ मंत्रालय,मुंबई दि.२०/मार्च २०२३

४) मा.अपर पोलीस महासंचालक (वाहतुक)यांचे जा.क्र.प्र.ज.वा./४४/वा/२६०५/२०२३,दिनांक २५/०६/२०२३

0000

**हेल्मेट अंमलबजावणी :-**

१) हेल्मेट न घालणा-यांमध्ये उच्च मृत्यूदरः-२०२४ मध्ये दुचाकी वापरणा-यांनी हेल्मेट न घातल्यामुळे भारतात (४२,००९) मृत्यू आणि (५८,१४६) जखमी झाले ज्यामध्ये दोन तृतियांश चालक आणि एक तृतियांश मागे बसलेले होते.

२)महारष्ट्रात लक्षणीय मृत्यू:-२०२२ मध्ये महाराष्ट्रात ७,७०० दुचाकी चालकांचा मृत्यू झाला. ज्यापैकी बहुतेक जणांचा मृत्यू हेल्मेट न घातल्यामुळे झाला.

३)अकोल्यामध्ये लक्षणीय मृत्यू, अकोला जिल्हयात मागील ०५ वर्षात २२३ मृत्यू आणि १४० गंभीर दुखपती हया हेल्मेट न घातल्याने झाल्या आहेत.

४)मृत्यूचा धोका कमी करणे:-मानक मोटार सायकल हेल्मेट योग्य रित्या परीधान केल्याने मृत्यूचा धोका जवळपास ४० टक्के आणि गंभीर दुखापतीचा धोका ७० टक्के पेक्षा जास्त कमी होतो.( वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन यांचा २०१३ चा रिपोर्ट )

५)डोक्याला दुखापत होण्यापासुन वाचविणे:-दुचाकी अपघातामध्ये डोक्याला दुखापत होणे हे मृत्यू आणि अपंगत्वाचे एक प्रमुख कारण आहे. हेल्मेट संरक्षणात्मक अडथळा म्हणुन काम करते. ज्यामुळे अपघाता दरम्यान कवटी आणि मेंदुवर होणारा परीणाम लक्षणीय रित्या कमी होतो.

६)आर्थीक नुकसान टाळणे:-अपघातामुळे वैदयकीय खर्च आणि उत्पादकतेत घट झाल्यामुळे मोठे आर्थीक नुकसान होतो. हेल्मेट घालण्यामुळे गंभीर दुखापती टाळुन आर्थीक भार कमी करता येतो.

७)पिलीयन रायडरचे (मागे बसलेले)संरक्षण करणे:-पिलीयन रायडर्स तितकेच असुरक्षीत असतात. हेल्मेट घालण्याची खात्री करणे त्यांचे सुरक्षीततेसाठी अत्यंत महत्वाचे आहेत. कारण पिलीयन रायडर्सना हेल्मेट नसल्यामुळे मोठे संख्येने घातक दुखापती झाल्या आहेत.

८)आरोग्यसेवेया भार कमी करणे:-हेल्मेट वापरल्याने डोक्याला दुखापत होण्यापासुन रोखल्याने आरोग्य सुविधा आणि संसाधनावरील ताण कमी होतो. ज्यामुळे ईतर वैदयकीय गरजांसाठी चांगले वाटप होते.
९)रस्ता सुरक्षा संस्कृती वाढविणे:-हेल्मेट घालणे एक सकारात्मक उदाहरण मांडते. इतरांना सुरक्षीत पध्दतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहीत करते. ज्यामुळे सर्वासाठी सुरक्षीत रस्ता वातावरण निर्माण होते.
१०)सुरक्षा मानकांचे पालन :-सुरक्षा मानकांची पुर्तता करणारे हेल्मेट वापरल्याने जास्तीत जास्त संरक्षण मिळते. गैरमानक हेल्मेट मुळे मृत्यू दरात वाढ होते. ज्यामुळे दर्जेदार संरक्षणात्मक उपरकणे महत्वाची ठरतात.
११)०१ जानेवारी २०२४ पासून ३१जानेवारी २०२५ पावेतो हेल्मेट चे अनपेड ई-चलान चा दंड वसुल करावा.
१२) जनजागृती पोलीस विभागाकडुन पासपोर्ट चारित्र पडताळणी करते वेळी आपले वाहणांवर प्रलंबीत असलेले जुने दंड पासपोर्ट चारित्र पडताळणी प्रमाणपत्र मिळणार नाही.
१३)जे पालक आपल्या पाल्याला सोडण्याकरिता स्कुल,कॉलेज व कोचिंग क्लासेस मध्ये सोडण्याकरिता दुचाकीवरिता येतात त्यांना हेल्मेट परिधान करणे अनिवार्य आहे.
१४)जे अल्पवयिन मुले दुचाकी वाहन चालवतील त्यांचे पालकांवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.
१५) ग्रामीण भागामध्ये पंचायत स्तरावर सुध्दा जनजागृती करणे गरजेचे आहे.
१६) नियमित पार्किंग चे ठिकाणी हेल्मेट शिवाय दुचाकी वाहन पार्क करु नये.

अपघातामध्ये जिव वाचविण्या करीता दुचाकी चालवितांना हेल्मेट घालणे हे एक साधे पण महत्वाचे पाउल आहे, जे जिव वाचवु शकते व गंभीर दुखापती टाळु शकते. भारताचे जिम्मेदार नागरीक म्हणुन दुचाकी चालवितांना हेल्मेट घालेणे ही सर्वांची जबाबदारी आहे. करीता खालील प्रमाणे सर्वांना आवाहन करण्यात येत आहे.

## शासकीय कार्यालय

१. शासकीय कार्यालयातील प्रभारी अधिकारी यांनी आपल्या कार्यालयामध्ये काम करणारे आपले अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयामध्ये दुचाकी वहान वापरणे करीताहेल्मेट सक्ती करावी.
२. हेल्मेट न घातल्यामुळे अपघात झालेल्या मृत्यूबाबत सर्वांना माहिती दयावी.
३. जे हेल्मेट घालुन येणार नाहीत त्यांना दुचाकी चालवितांना हेल्मेट घालणेबाबत समज देण्यात यावी.

जीवन हे अमुल्य असुन आपण जेव्हा वाहन घेवुन घराबाहेर पडतो तेव्हा आपला संपुर्ण परिवार आपण काम पुर्ण करुन सुखरुप घरी परत यावे म्हणुन आपले वाटेकडे नजर लावुन बसलेले असतात.आपण एक जबादार नगरिक म्हणुन सर्वांनी वाहनाव्दारे प्रवास करतांना हेल्मेट परिधान करुन आपले कर्तव्याचे पालन करावे तसेच परिवारामध्ये सुरक्षीततेची भावना निर्माण करावी असे आवाहन करण्यात येत आहे.

वाहतुक पोलीस नियमीत पुर्ण सक्तीने हेल्मेट कार्यवाही आणखी वेगाने पुढे करणार आहे याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**सडक सुरक्षा जीवन रक्षा**
**सुरक्षित रहा**
**Wear Helmet Save Life**

प्रति,

.........................................

.........................................

...............जि.अकोला.

624
13/12/2025